**प्रेस नोट**

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - ३१/०३/२०१९

## वानवडी पोलीसांनी तडीपार आरोपीस फिल्मी स्टाईलने पकडुन केले जेरबंद

दिनांक ३१/०३/२०१९ रोजी वानवडी पोलीस ठाणे तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे वानवडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पो.शि.सुधिर सोनावणे व पो.शि.नासीर देशमुख यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वानवडी स्टेशन कडील तडीपार अरोपी नामे जाकीर वहाब इनामदार हा सय्यदनगर येथे येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने स्टाफच्या मदतीने सय्यद नगर एरीया मध्ये नमुद इसमाचा शोध घेतला असता एक इसम हा हातात कोयता घेवून आजूबाजूच्या परीसरातील दुकानदारास दुकान बंद करण्यास सांगुन दहशत पसरवत असताना आम्ही सदर ठिकाणी पोचलो असता आम्हास पाहताच क्षणी सय्यदनगर रेल्वे गेट च्या दिशेने पळुन जावु लागला त्यावेळी त्याचा पाठलाग करून सदर इसमाला त्याचेकडील कोयत्यासह ताब्यात घेण्यात आले व नाव विचारले असता त्याचे नाव जाकीर वहाब इनामदार वय २३ वर्षे रा. गल्ली नंबर १५ ए सय्यदनगर हडपसर पुणे असे असल्याचे सांगितले असुन त्याचे ताब्यातुन एक १००/- रुपयाचा लोखंडी कोयता जप्त करण्यात आलेला असुन त्याचेवर वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर २१७/२०१९ आर्म ॲक्ट कलम ४,२५, महा.पोलीस कायदा कलम १४२, ३७(१)(३) / १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी सो, अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग, पुणे शहर, श्री प्रकाश गायकवाड सो, पोलीस उप-आयुक्त परिमडळ ५, पुणे शहर, श्री नागनाथ वाकुडे, सहा.पोलीस आयुक्त वाहतुक विभाग, पुणे शहर (प्रभारी सहा.पो.आयुक्त वानवडी विभाग) श्री सुनिल भोसले, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री रावसाहेब भापकर पोलिस निरिक्षक (गुन्हे), वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक श्री दत्ताजीराव मोहिते, पो.हवा.निसार खान, पो.ना.योगेश गायकवाड, पो.शि.प्रतिक लाहिगुडे, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.महेश कांबळे यांचे पथकाने केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरिक्षक
वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर